# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

# गृहपाठ

## बी. ए. इतिहास

द्वितीय वर्ष (सत्र ३ व ४)

२०१७-१८

प्रती : १०००

# गृहपाठ लिहिण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी पुढील सूचना वाचाव्यात व त्याप्रमाणे गृहपाठांचे काम करावे.

१. बी. ए. (विशारद) सामाजिकशास्त्रे या अभ्यासक्रमातील गृहपाठ लेखन हा महत्त्वाचा आणि अनिवार्य भाग आहे. गृहपाठ लिहिण्यापूर्वी विद्यार्थ्याने संबंधित विषयाचे पुस्तक वाचून मगच गृहपाठ लिहिणे आवश्यक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचा विषयाचा अभ्यास होतो. स्वयंअध्ययनाची सवय व्हावी व उत्तरपत्रिका लेखनाचा सराव व्हावा हाच गृहपाठ लेखनामागील हेतू आहे.

२. गृहपाठ लिहिताना पुस्तकातील मजकुराची केवळ नक्कल करू नये. विद्यार्थ्याने विषय समजून घेऊन गृहपाठ लिहिला आहे की नाही हे जाणीवपूर्वक पाहिले जाते आणि त्याप्रमाणे गुण दिले जातात.

३. गृहपाठ त्यांच्या अनुक्रमानुसार व सलग लिहावेत. एक गृहपाठ संपल्यावर ठळक रेघ मारून पुढील ओळीवर अथवा नव्या पानावर पुढील गृहपाठ लिहावा. उत्तरात लाल शाईचा वापर करू नये. योग्य समास सोडावा.

४. मोठ्या प्रश्नांचे उत्तर ४० ते ५० ओळीत असावे. गरजेनुसार जास्त चालेल. टीपा लिहा प्रत्येकी २०–२५ ओळीत उत्तरे असावे.

५. उत्तरात गरज नसताना १, २, ३....... असे आकडे घालण्याऐवजी योग्य परिच्छेद पाडावेत.

६. उत्तराला सुरुवात करताना प्रास्ताविक व उत्तराच्या शेवटी समारोप असेल तर ते उत्तर अधिक चांगले मानले जाते.

**७. सत्र ३ व सत्र ४ चे गृहपाठ एकत्रित दिलेले आहेत याची नोंद घ्यावी.**

८. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार 'क्षेत्रीय कार्य' अथवा उपक्रम हा प्रश्न घालण्यात आला आहे. त्यासाठी अवांतर वाचन व सद्यःस्थितीतील घडामोडींचे निरीक्षण आवश्यक आहे.

## गृहपाठ सादर करण्याची मुदत

| **सत्र** | **विना विलंबशुल्क** | **विलंब शुल्कासह** |
|---|---|---|
| तिसरे | १५ ऑक्टोबर २०१७ | ३१ ऑक्टोबर २०१७ |
| चौथे | २८ फेब्रुवारी २०१८ | १५ मार्च २०१८ |

# प्राचीन भारताचा इतिहास (मौर्यपूर्व काळ) (HC - 301)

**सत्र ३ : प्रकरण १ ते ५**

---

**टीप : नमुना उत्तरात दिलेली प्रस्तावना व समारोप हे उदाहरणादाखल आहेत. त्या व्यतिरिक्त प्रश्नाशी सुसंगत अशी प्रस्तावना व समारोप स्वतंत्रपणे लिहिल्यास त्याचे स्वागतच आहे.**

**प्र. १. इतिहासाचे स्वरूप स्पष्ट करा.** **(गुण : १५)**

**उत्तर – प्रस्तावना –** प्रकरणाच्या प्रास्ताविकामधील इतिहासाची व्याख्या द्यावी.

**इतिहासाचे स्वरूप –** इतिहास एक शास्त्र, इतिहास एक कलाकृती, इतिहासाची व्यक्तिनिष्ठता व गटनिष्ठता, इतिहासाची परिवर्तनशीलता व कालसापेक्षता, लिखित इतिहास हा वर्तमानकाळ व भूतकाळ यांच्यातील कधीही न संपणारा संवाद, इतिहासाची व्यापकता, इतिहासाची समन्वितता.

**समारोप –** ४ ते ५ वाक्यांत इतिहासाचे महत्त्व लिहावे.

**प्र. २. इ. स. पूर्व सहाव्या शतकातील धार्मिक परिवर्तनाची माहिती द्या.** **(गुण : १५)**

**उत्तर – प्रस्तावना –** इ. स. पूर्व सहावे शतक हे अनेक अर्थांनी परिवर्तनाचे शतक ठरले. या शतकात लोह तंत्रज्ञानाचा उदय झाला. शेतीचा व व्यापाराचा विकास झाला. शहरीकरणाला चालना मिळाली. या बरोबरीनेच धार्मिक क्षेत्रातही बदल घडून आले.

**इ. स. पूर्व सहाव्या शतकातील धार्मिक परिवर्तन –** धार्मिक परिवर्तनाची पार्श्वभूमी : यज्ञमार्गाच्या व ज्ञानमार्गाच्या मर्यादा, भक्तीत* बदल व त्यातून निर्माण झालेल्या समस्या, संन्यस्तवृत्तीला चालना, श्रमण परंपरा, जैन धर्माचा उदय व आचारविचार, बौद्ध धर्माचा उदय व आचारविचार.

**समारोप –** जैन* व बौद्ध* धर्मांचा प्रसार का व कसा झाला ते ४ ते ५ वाक्यांत लिहावे.

**प्र. ३. थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतीही २)** **(गुण : १५)**

**अ) इतिहासाच्या लिखित साधनांची माहिती द्या.**

**उत्तर – प्रस्तावना –** इतिहासाची संदर्भसाधने म्हणजे काय ते २ ते ३ वाक्यांत लिहा.

**इतिहासाची लिखित साधने –** लिखित साधनांचे महत्त्व, लिखित साधनांची सुरुवात, लिखित साधनांचे प्रकार.

**समारोप –** लिखित साधनांचे परीक्षण २ ते ३ वाक्यांत लिहावे.

**आ) हडप्पा / सिंधू संस्कृतींतील सामाजिक जीवनाचे वर्णन करा.**

**उत्तर – प्रस्तावना –** हडप्पा संस्कृतीचा शोध कसा लागला ते २ ते ३ वाक्यांत लिहा.

**हडप्पा/ सिंधू संस्कृतींतील सामाजिक जीवन –** समाजरचना, आहार, वेशभूषा व केशभूषा, अलंकार, खेळ व मनोरंजनाची साधने, लिपी.

**समारोप –** हडप्पा / सिंधू संस्कृतींचा ऱ्हास का घडून आला असावा, याबाबतची मते २ ते ३ वाक्यांत लिहा.

**इ) आर्यांच्या आश्रमव्यवस्थेचे वर्णन करा.**

**उत्तर – प्रस्तावना –** आश्रमव्यवस्था म्हणजे काय ते २ ते ३ वाक्यांत लिहा.

**आश्रमव्यवस्था –** ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम, संन्यासाश्रम.

समारोप – आज अशी व्यवस्था असावी असे तुम्हाला वाटते का ? तुमचे मत २ ते ३ वाक्यांत लिहा.

**ई) पर्शियन व ग्रीक आक्रमणांची माहिती द्या.**

**उत्तर – प्रस्तावना –** भारतावर पर्शियन व ग्रीक लोकांनी केलेले आक्रमण हा भारतीय लोकांच्या दृष्टीने एक अनोखा अनुभव होता. हा काळ भारतातील साम्राज्यवादाच्या उदयाचा कालखंड होता.

**पर्शियन व ग्रीक आक्रमणे –** ग्रीक व पर्शियन लोक कोणत्या भागांतून आले ? भारताच्या कोणत्या भागांवर त्यांनी आक्रमणे केली ? प्रमुख संघर्ष, ग्रीक आक्रमणांचे परिणाम.

**समारोप –** ग्रीकांच्या पराभवाबाबत २ ते ३ वाक्ये लिहा.

**प्र. ४. टीपा लिहा. (कोणत्याही २)** **(गुण : १५)**

**अ) प्राचीन भारताच्या इतिहासाची भौतिक साधने**

**उत्तर – प्रस्तावना –** इतिहासाची भौतिक साधने म्हणजे काय ते २ ते ३ वाक्यात लिहावे.

**प्राचीन भारताच्या इतिहासाची भौतिक साधने –** प्राचीन अवशेष व स्मारके, नाणी, आलेख, ताम्रपट, शिलालेख.

समारोप – भौतिक साधनांचे महत्त्व २ ते ३ वाक्यांत लिहा.

**आ) हडप्पा/ सिंधू संस्कृतींतील नगररचना**

**उत्तर – प्रस्तावना –** नगरे म्हणजे काय व त्यांचे महत्त्व २ ते ३ वाक्यांत लिहावे.

**हडप्पा/ सिंधू संस्कृतींतील नगररचना –** भव्य तटबंदी, रस्त्यांचे नियोजन, दिवाबत्ती, गृहरचना, बंदिस्त गटारे, महास्नानगृह, धान्याची कोठारे.

**समारोप –** हडप्पा/ सिंधू संस्कृतींतील नगररचना हे हडप्पा/ सिंधू संस्कृती प्रगत असल्याचे लक्षण होते.

**इ) वर्णव्यवस्था**

**उत्तर – प्रस्तावना –** वर्णव्यवस्था म्हणजे काय ते २ ते ३ वाक्यांत लिहावे.

**वर्णव्यवस्था –** सुरुवातीची व्यवस्था, वर्णनिश्चितीचे निकष, चार वर्ण व त्यांचे स्थान, कार्ये व अधिकर, बंधने, वर्णव्यवस्थेचे बदलते स्वरूप, जाति–उपजातींची निर्मिती, विषमता, अस्पृश्यता.

**समारोप –** जाती आणि आजचा काळ यांबाबतचे आपले मत २ ते ३ वाक्यांत लिहावे.

**ई) इ. स. पूर्व सहाव्या शतकातील शेतीचा विकास**

**उत्तर – प्रस्तावना –** आर्यांचा मूळ व्यवसाय यावर २ ते ३ वाक्ये लिहावीत.

**इ. स. पूर्व सहाव्या शतकातील शेतीचा विकास –** शेतीवरील भर, जमिनीची मालकी, लोखंडी फाळचा वापर व शेतीचा विकास, खते, जलसिंचन, नैसर्गिक आपत्ती व उपाय, शेती उत्पादने, महसूल पद्धती व प्रशासन इ.

समारोप – प्राचीन काळातील शेतीच्या तुलनेत आजच्या काळातील शेतीची २ ते ३ वाक्यांत माहिती लिहा.

**प्र. ५. विद्यार्थी मित्रांनो, या प्रश्नामधील उपप्रश्नांची उत्तरे तुम्हाला पुस्तकात तयार मिळणार नाहीत. क्रेडिट सिस्टिममध्ये यु. जी. सी.च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार विद्यार्थ्यांनी त्यांची निरीक्षणशक्ती, आकलनक्षमता व विचारशक्ती यांचा वापर करून काही काम करणे अपेक्षित आहे. खालील प्रश्न तुम्हाला मनोरंजक व खऱ्या अर्थाने विचार व अभ्यास करायला प्रेरणा देणारे असतील. (गुण : २०)**

अ) इ. स. पूर्व सहाव्या शतकामध्ये भारतात लोह तंत्रज्ञानाचा शोध लागला. हा शोध किती महत्त्वाचा होता आणि आहे हे कळण्यासाठी तुमच्या आसपास लोखंडाच्या किती वस्तू आहेत, याचे निरिक्षण करा आणि लोखंडाच्या अशा १० वस्तूंची यादी तयार करा. (गुण : ५)

आ) आजच्या काळातील जातींचा प्रभाव यावर निबंध लिहा. (गुण : १०)

***

# मराठ्यांचा इतिहास (शिव काळ) (HC - 302)

**सत्र ३ : प्रकरण १ ते ७**

---

**टीप : नमुना उत्तरात दिलेली प्रस्तावना व समारोप हे उदाहरणादाखल आहेत. त्या व्यतिरिक्त प्रश्नाशी सुसंगत अशी प्रस्तावना व समारोप स्वतंत्रपणे लिहिल्यास त्याचे स्वागतच आहे.**

**प्र. १. मराठी राज्याच्या उदयास कारणीभूत ठरलेले घटक कोणते? (गुण : १५)**

**उत्तर – प्रस्तावना –** मराठी राज्याच्या उदयाबाबत ग्रँट डफ याचा वणवा सिद्धांत. न्या. रानड्यांचे योगदान याबाबत ४ ते ५ वाक्ये लिहावीत.

**मराठी राज्याच्या उदयास कारणीभूत ठरलेले घटक –** महाराष्ट्राची भौगोलिक वैशिष्ट्ये, मराठी लोकांची वैशिष्ट्ये, राजकीय परिस्थिती : अनुकूल व प्रतिकूल घटक, संतांची कामगिरी, इतर पूरक घटक, शिवाजीमहाराज.

**समारोप –** मराठी राज्याच्या उदयाचे महत्त्व ४ ते ५ वाक्यांत लिहावे.

**प्र. २. संभाजीच्या कार्याचे मूल्यमापन करा. (गुण : १५)**

**उत्तर – प्रस्तावना –** अंतर्गत संघर्ष व संभाजीचे सत्ताग्रहण याबाबत ४ ते ५ वाक्यांत लिहावे.

**संभाजीच्या कार्याचे मूल्यमापन –** संभाजीचे गुण व दोष या संदर्भात पुढील मुद्द्याचा विस्तार करावा. सत्तासंघर्ष, राजकीय कामगिरी, राज्यकारभार, कवी कलुश व संभाजी संबंध, यशापयश, शेवट.

**समारोप –** संभाजीचा मृत्यू आणि नंतरचा स्वातंत्र्यलढा यांबाबत ४ ते ५ वाक्ये लिहावीत.

**प्र. ३. थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतीही २) (गुण : १५)**

**अ) मराठ्यांच्या इतिहासाच्या मराठी संदर्भ साधनांची माहिती लिहा.**

**उत्तर – प्रस्तावना –** मराठ्यांच्या इतिहासाची लिखित साधने यावर २ ते ३ वाक्ये लिहावीत.

**मराठ्यांच्या इतिहासाची मराठी संदर्भ साधने –** सरकारी कागदपत्रे, शकावल्या, शिलालेख, रोजनिशा, बखरी, ललित साहित्य : संतकाव्य, पंतकाव्य, शाहिरी काव्य.

**समारोप –** मराठी संदर्भ साधनांचे महत्त्व २ ते ३ वाक्यांत लिहावे.

**आ) सिद्दी जौहरच्या मोहिमेची माहिती लिहा.**

**उत्तर – प्रस्तावना –** अफझलखान वधानंतरची आदिलशाहीची अवस्था याबाबत २ ते ३ वाक्यांत लिहा.

**सिद्दी जौहरची मोहीम –** मोहिमेचे कारण, पन्हाळ्याचा वेढा, शिवाजी महाराजांची पन्हाळ्याहून सुटका, पावनखिंडीचा लढा व मोहिमेचा शेवट.

**समारोप –** शाहिस्तेखानाची मोहीम आणि तिचा आदिलशाहीबरोबरील संघर्षावर झालेला परिणाम यांबाबत २ ते ३ वाक्ये लिहावीत.

**इ) शिवाजी महाराजांच्या कर्नाटक मोहिमेची कारणे लिहा.**

**उत्तर – प्रस्तावना –** राज्याभिषेकानंतरची व शिवाजीमहाराजांच्या आयुष्यातील सर्वांत मोठी मोहीम.

**शिवाजी महाराजांच्या कर्नाटक मोहिमेची कारणे –** पैसे मिळविणे, जहागिरीवरील हक्क मिळविणे, कर्नाटकातील अनुकूल राजकीय परिस्थिती, मादण्णाचा हेतू, रघुनाथपंत हणमंतेचा हेतू, व्यंकोजीला स्वतंत्र राज्याची प्रेरणा देणे, संरक्षण सीमा तयार करणे.

समारोप – कर्नाटक मोहिमेचे परिणाम २ ते ३ वाक्यांत लिहावे.

**ई) ताराबाईंच्या कारकीर्दीतील मराठे–मुघल संघर्षाचा आढावा घ्या.**

**उत्तर – प्रस्तावना –** राजारामाचा मृत्यू व ताराबाईचे नेतृत्व यावर २ ते ३ वाक्ये लिहावीत.

**ताराबाईंच्या कारकीर्दीतील मराठे–मुघल संघर्ष –** महत्त्वाचे गड मुघलांच्या ताब्यात, मराठ्यांचा कडवा व चिवट प्रतिकार आणि ताराबाईंचे कर्तृत्व, धनाजी जाधवाचा पराक्रम, औरंगजेबाचा मृत्यू व संघर्षाचा शेवट.

**समारोप –** शाहू–ताराबाई संघर्षाबाबत २ ते ३ वाक्ये लिहाींवित.

**प्र. ४. टीपा लिहा. (कोणत्याही २) (गुण : १५)**

**अ) मराठ्यांच्या इतिहासाची भौतिक साधने**

**उत्तर – प्रस्तावना –** इतिहासाची भौतिक साधने म्हणजे काय ते २ ते ३ वाक्यांत लिहावे.

**प्राचीन भारताच्या इतिहासाची भौतिक साधने –** स्थापत्य/ इमारती व त्यांचे अवशेष, वस्तू.

**समारोप –** भौतिक साधनांचे महत्त्व २ ते ३ वाक्यांत लिहा.

**आ) जावळी प्रकरण**

**उत्तर – प्रस्तावना –** जावळीच्या प्रदेशाबाबत २ ते ३ वाक्ये लिहावीत.

**जावळी प्रकरण –** जावळी व आदिलशाही संबंध, जावळीचे मोरे व त्यांचा स्वराज्यास उपद्रव, जावळीवरील हल्ला, चंद्रराव मोरेची हत्या, जावळी मोहिमेचा फायदा.

**समारोप –** जावळीनंतरच्या शिवाजी महाराजांच्या हालचालींबाबत २ ते ३ वाक्ये लिहावीत.

**इ) सुरतेवरील पहिला हल्ला (इ. स. १६६४)**

**उत्तर – प्रस्तावना –** शाहिस्तेखानावरील हल्ल्याचे परिणाम, पाठोपाठ सुरतेवरील हल्ल्याचा धक्का, यासंदर्भात २ ते ३ वाक्ये लिहावीत.

**सुरतेवरील पहिला हल्ला –** सुरतेवरील हल्ल्याचे हेतू, मोहिमेची पूर्वतयारी, सुरतेवरील हल्ला.

**समारोप –** शिवाजी महाराजांच्या बंदोबस्तासाठी मिर्झाराजा जयसिंगाची मोहीम याबाबत २ ते ३ वाक्ये लिहावीत.

**ई) शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक व राज्याभिषेकाची आवश्यकता**

**उत्तर – प्रस्तावना –** राज्याभिषेक कधी व कोठे झाला ते २ ते ३ वाक्यांत लिहावे.

**राज्याभिषेक समारंभ –** विविध विधी, राज्याभिषेक शक, राज्यव्यवहार कोश, करणकौस्तुभ या ग्रंथांची निर्मिती, अष्टप्रधानमंडळ.

**राज्याभिषेकाची आवश्यकता –** राजांची प्रतिमा बदलण्याची गरज, सत्तेचे पावित्र्य, कायदेशीरपणा व स्वातंत्र्य प्रस्थापित करणे, इतरांचा दृष्टिकोन बदलण्याची गरज.

**समारोप –** मूळ राज्याभिषेकानंतर तांत्रिक राज्याभिषेक का करण्यात आला ते २ ते ३ वाक्यांत लिहावे.

**प्र. ५. विद्यार्थी मित्रांनो, या प्रश्नामधील उपप्रश्नांची उत्तरे तुम्हाला पुस्तकात तयार मिळणार नाहीत. क्रेडिट सिस्टिममध्ये यु. जी. सी.च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार विद्यार्थ्यांनी त्यांची निरीक्षणशक्ती, आकलनक्षमता व विचारशक्ती यांचा वापर करून काही काम करणे अपेक्षित आहे. खालील प्रश्न तुम्हाला मनोरंजक व खऱ्या अर्थाने विचार व अभ्यास करायला प्रेरणा देणारे असतील. (गुण : २०)**

**अ) खालील घटनांची मांडणी कालानुक्रमानुसार करा. (गुण : ५)**

प्रस्तुत प्रश्नामध्ये दिलेल्या घटनांचा क्रम कालक्रमानुसार लावा.

| उदा. प्रश्नातील क्रम | कालानुक्रम |
|---|---|
| १. शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक | २. शिवाजीमहाराजांचा जन्म |
| २. शिवाजी महाराजांचा जन्म | १. शिवाजीमहाराजांचा राज्याभिषेक |
| ३. राजारामाचा मृत्यू | ४. संभाजीचा मृत्यू |
| ४. संभाजीचा मृत्यू | ३. राजारामाचा मृत्यू |

वर उदाहरणात दिल्याप्रमाणे खालील घटनांचा योग्य क्रम लावा.

१. आग्र्याहून सुटका

२. पुरंदरचा तह

३. शिवाजीराजांचा राज्याभिषेक

४. अफजलखानाचा वध

५. कर्नाटक मोहीम

आ) आजच्या काळात शिवाजी महाराज हे राजकारणाचे साधन झाले आहे, असे तुम्हाला वाटते का ? आपले मत उदाहरणे देऊन स्पष्ट करा. शिवाजी महाराजांचे अनुकरण राज्यकर्त्यांनी कोणत्या बाबतीत करावे, असे तुम्हाला वाटते ? सविस्तर लिहा. (गुण : १०)

***

# चीनचा इतिहास (HC - 303)

**सत्र ३ : प्रकरण १ ते ७**

---

**टीप : नमुना उत्तरात दिलेली प्रस्तावना व समारोप हे उदाहरणादाखल आहेत. त्या व्यतिरिक्त प्रश्नाशी सुसंगत अशी प्रस्तावना व समारोप स्वतंत्रपणे लिहिल्यास त्याचे स्वागतच आहे.**

**प्र. १. चीनमधील १९११ च्या क्रांतीची कारणे लिहा. (गुण : १५)**

**उत्तर – प्रस्तावना –** १९११ च्या क्रांतीचे स्वरूप ४ ते ५ वाक्यांत करावे.

**१९११ च्या क्रांतीची कारणे –** दुबळी मांचू राजसत्ता, अन्यायी करवाढ व आर्थिक दुरवस्था, भ्रष्ट प्रशासन, पाश्‍चात्त्य विचारांचा प्रभाव, विविध उठाव, डॉ. सन यत–सेन यांचे नेतृत्व, युआन शि काईचे कार्य.

**समारोप –** ४ ते ५ वाक्यांत क्रांतीचे मूल्यमापन करावे.

**प्र. २. इ. स. १८९४ मध्ये चीन व जपान यांच्यात युद्ध का झाले? या युद्धात चीनचा पराभव का झाला? (गुण : १५)**

**उत्तर – प्रस्तावना –** हे युद्ध कोणत्या प्रश्नावरून सुरू झाले?

**चीन–जपान युद्धाची कारणे व पार्श्वभूमी –** जपानची महत्त्वाकांक्षा व सामर्थ्य, कोरियाचे स्थान व महत्त्व, चीनचे कोरियातील हितसंबंध, चीनची दुर्बलता, कोरियातील परिस्थिती व जपानचा हस्तक्षेप, तत्कालीन कारण : कोरियातील तोंग हक उठाव.

**चीनच्या पराभवाची कारणे –** मुत्सद्देगिरीवरील भर व अपयश, आरमाराचे दोष, चिनी सेनानी ली याचे सैन्य, आरमाराकडे दुर्लक्ष, सत्ता व जबाबदारी यांची फारकत, युद्ध ली विरुद्ध जपान असे झाले.

**समारोप –** १९११ च्या क्रांतीला चलाना.

**प्र. ३. थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतीही २) (गुण : १५)**

**अ) तायपिंगांनी कोणत्या सुधारणा घडवून आणल्या?**

**उत्तर – प्रस्तावना –** तायपिंग बंडाचा काळ, कारणे व नेतृत्व (चार ते पाच वाक्यांत).

**तायपिंगांनी केलेल्या सुधारणा –** न्याय व समतेच्या आधारे जमिनीचे फेरवाटप, स्त्रीविषयक सुधारणा, सुधारणांचे महत्त्व व मूल्यमापन.

**समारोप –** तायपिंग बंडाचा शेवट याबद्दल ४ ते ५ वाक्ये लिहावीत.

**आ) बॉक्सर उठावाची कारणे लिहा.**

**उत्तर – प्रस्तावना –** इ. स. १८९९–१९०० मध्ये चीनमध्ये मुष्टियोद्ध्यांच्या इ–हो चुआन या संघटनेने मांचू राजवट व पाश्चात्त्यांविरुद्ध उठाव केला.

**बॉक्सर उठावाची कारणे –** मांचू राजवटीविरुद्ध असंतोष, आर्थिक शोषण व ख्रिश्चन धर्माचा प्रसार यामुळे पाश्चात्त्यांविरुद्ध असंतोष, नैसर्गिक आपत्ती, इ–हो चुआनची लोकप्रियता इ..

**समारोप –** हा उठाव मांचू सत्तेने पाश्चात्त्यांच्या मदतीने दडपला. उठावानंतर पाश्चात्त्यांनी चिनी सरकारवर खंडणी लादली. या अपयशातून मांचू राजवट नष्ट करण्याची निकड तीव्रतेने वाटू लागली.

**इ) चीनमध्ये साम्यवादी (कम्युनिस्ट) पक्षाचा उदय व विकास कसा झाला?**

**उत्तर – प्रस्तावना –** १९११ ची क्रांती व तिचे अपयश.

**साम्यवादी पक्षाचा उदय व विकास**

**कारणे व पार्श्वभूमी –** मे १९११ च्या क्रांतीचे योगदान, पहिले महायुद्ध व पाश्चात्त्यांबद्दल चीड, रशियन क्रांतीपासून प्रेरणा.

**उदय व विकास –** मार्क्सिस्ट अभ्यासगटांची स्थापना, १९२१ साम्यवादी पक्षाची स्थापना.

**समारोप –** साम्यवादी पक्षाचा संघर्ष व सत्तास्थापना.

**ई) माओकालीन सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक सुधारणांची माहिती द्या.**

**उत्तर – प्रस्तावना –** इ. स. १९४९ मध्ये चीनमध्ये साम्यवादी क्रांती होऊन माओ त्से तुंगच्या हाती सत्ता गेली. त्यानंतर सुधारणांना सुरुवात.

**सामाजिक सुधारणा –** सामाजिक समतेसाठी प्रयत्न, अनिष्ट प्रथांचे उच्चाटन.

**शैक्षणिक सुधारणा –** प्रथम लवचिक धोरण, शिक्षण साम्यवादाला पोषक बनविण्याचे प्रयत्न, मोफत, विज्ञाननिष्ठ व साम्यवादी शिक्षण, स्वतंत्र विचारांची गळचेपी.

**धार्मिक सुधारणा –** धर्म ही 'अफूची गोळी' हा विश्वास, राष्ट्रीय समाज निर्माण करण्याचा प्रयत्न, प्रथम धार्मिक स्वातंत्र्य, नंतर मात्र सार्वजनिक जीवनातील धर्माचे महत्त्व कमी करण्याचे पद्धतशीर प्रयत्न.

**समारोप –** साम्यवादाला पोषक सुधारणांचा अवलंब.

**प्र. ४. टिपा लिहा. (कोणत्याही २) (गुण : १५)**

**अ) पहिले अफू युद्ध व नानकिंगचा तह**

**उत्तर – प्रस्तावना –** इ. स. १८३९ मध्ये चीन व चीनमधील ब्रिटिश व्यापारी यांच्यात युद्ध. युद्धाचा निकाल काय झाला इ. ४ ते ५ वाक्यांत लिहावे.

**कारणे –** पाश्चात्त्यांना येणाऱ्या व्यापारातील अडचणी, चीनकडून मिळणारी अपमानास्पद वागणूक, अफूच्या व्यापारातील इंग्लंडला होणारा फायदा व चीनकडून त्या व्यापारावर आलेली बंदी, ब्रिटिशांविरुद्ध लिन–त्सेने केलेली कारवाई, चिनी खेडुताचा मृत्यू.

**युद्ध –** २ वर्षे चालून अखेर चीनचा पराभव.

**नानकिंगचा तह –** कलमे–खंडणी, पाच बंदरे व्यापारासाठी खुली, आयात–निर्यातीवरील कर न्याय्य असावेत, को हाँगची मक्तेदारी नष्ट, हाँगकाँग बेट इंग्लंडला, सर्व देशांना समान वागणूक, बेकायदेशीर व्यापारास प्रतिबंध करण्यास इंग्लंडचे सहकार्य.

**समारोप –** युद्धाचे परिणाम – चीनचा दुबळेपणा सिद्ध, चीनच्या आधुनिकीकरणाची सुरुवात ४ ते ५ वाक्यांत लिहावे.

**आ) शंभर दिवसांचे सुधारणा पर्व**

**उत्तर – प्रस्तावना –** सुरुवातीच्या सुधारणांचे अपयश याबाबत २ ते ३ वाक्ये लिहावीत.

**शंभर दिवसांचे सुधारणा पर्व –** राजकीय पार्श्वभूमी, कांग यु वेई चे नेतृत्व, सुधारणा – सम्राटाचे महत्त्व वाढविले, मर्यादित राजेशाही, प्रशासनाचे आधुनिकीकरण, शैक्षणिक सुधारणा, कायदेविषयक सुधारणा, आर्थिक सुधारणा, सुधारणांचा शेवट, सुधारणांचे यशापयश, मूल्यमापन.

**समारोप –** शंभर दिवसांच्या सुधारणा पर्वाच्या अपयशाने १९११ च्या क्रांतीची पार्श्वभूमी तयार केली.

**इ) क्योमिंतांग पक्षाचा उदय व विकास**

**उत्तर – प्रस्तावना –** इ. स. १९२८ मध्ये चीनमध्ये क्योमिंतांग पक्षाचे लोकशाही सरकार स्थापन झाले. चीनची सूत्रे इ. स. १९४९ पर्यंत क्योमिंतांग पक्षाच्या हातात होती.

**पक्षाची स्थापना –** इ. स. १९१२. १९११ च्या क्रांतीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या तुंग मेंग हुई या गुप्त संघटनेचे रूपांतर या पक्षात झाले.

**उदय व विकास –** इ. स. १९१३ मध्ये युआन शि–काईकडून क्योमिंतांगवर बंदी व पुढे लोकशाहीही बरखास्त. इ. स. १९१७ मध्ये कँटन येथे क्योमिंतांगच्या प्रतिसरकारची स्थापना. डॉ. सन यत् सेन हा पक्षाचा आजीव अध्यक्ष. रशियाच्या मदतीतून लष्कर उभारणी. सन यत् सेनच्या तीन तत्त्वांना प्राधान्य, लोकशाही विकेंद्रीकरणाचा स्वीकार. कम्युनिस्ट पद्धतीची यंत्रणा व तंत्र परंतु, तत्त्व मात्र लोकशाहीचे.

**समारोप –** डॉ. सन यत् सेनच्या मृत्यूनंतर क्योमिंतांग पक्षात अंतर्गत संघर्ष. इ. स. १९२८ मध्ये चिआंग कै. शेकच्या हाती पक्षाची सूत्रे.

**ई) दीर्घ कूच**

**उत्तर – प्रस्तावना –** क्योमिंतांग–कम्युनिस्ट संबंधांचे स्वरूप.

**दीर्घ कूच –** क्योमिंतांगचा ज्युई चीन राज्याला वेढा, साम्यवाद्यांची शेन्सी प्रांताकडे कूच, दीर्घ कूचचे

**फायदे –** साम्यवादाचा प्रचार, जमिनींचे समान वाटप, अन्नधान्याचे वाटप, करात कपात, लष्करी प्रशिक्षण, लष्कर भरती, जागृतीसाठी उपक्रम, नेतृत्व व अनुयायी यांचे गुण सिद्ध. **तोटे –** विविध संकटे, अनेकजण मृत्युमुखी.

**समारोप –** दीर्घ कूचनंतरचे क्योमिंतांग–कम्युनिस्ट संबंध.

**प्र. ५. विद्यार्थी मित्रांनो, या प्रश्नामधील उपप्रश्नांची उत्तरे तुम्हाला पुस्तकात तयार मिळणार नाहीत. क्रेडिट सिस्टिममध्ये यु. जी. सी.च्या मार्गदर्शक तत्त्वानुसार विद्यार्थ्यांनी त्यांची निरीक्षणशक्ती, आकलनक्षमता व विचारशक्ती यांचा वापर करून काही काम करणे अपेक्षित आहे. खालील प्रश्न तुम्हाला मनोरंजक व खऱ्या अर्थाने विचार व अभ्यास करायला प्रेरणा देणारे असतील. (गुण : २०)**

**अ) खालील घटनांची मांडणी कालानुक्रमानुसार करा. (गुण : १०)**

प्रस्तुत प्रश्नामध्ये दिलेल्या घटनांचा क्रम कालक्रमानुसार लावा.

| उदा. **प्रश्नातील क्रम** | **कालानुक्रम** |
|---|---|
| १. शिवाजीमहाराजांचा राज्याभिषेक | २. शिवाजीमहाराजांचा जन्म |
| २. शिवाजीमहाराजांचा जन्म | १. शिवाजीमहाराजांचा राज्याभिषेक |
| ३. राजारामाचा मृत्यू | ४. संभाजीचा मृत्यू |
| ४. संभाजीचा मृत्यू | ३. राजारामाचा मृत्यू |

वर उदाहरणात दिल्याप्रमाणे खालील घटनांचा योग्य क्रम लावा.

१. चीन–जपान युद्ध
२. अफूचे दुसरे युद्ध
३. बॉक्सर बंड
४. साम्यवादी पक्षाची स्थापना
५. दीर्घ कूच

आ) भारत ही चिनी वस्तूंची मोठी बाजारपेठ आहे. कमी किंमत हे या वस्तूंचे वैशिष्ट्य आहे. अशा भारतात मिळणाऱ्या ५ चिनी वस्तूंची यादी तयार करा. **(गुण : १०)**

***

# प्राचीन भारताचा इतिहास (मौर्यकाळ ते इ. स. १२००) (HC - 401)

**सत्र ४ : प्रकरण ६ ते १०**

---

**टीप : नमुना उत्तरात दिलेली प्रस्तावना व समारोप हे उदाहरणादाखल आहेत. त्या व्यतिरिक्त प्रश्नाशी सुसंगत अशी प्रस्तावना व समारोप स्वतंत्रपणे लिहिल्यास त्याचे स्वागतच आहे.**

**प्र. १. चंद्रगुप्त मौर्याच्या साम्राज्यविस्ताराचे वर्णन करून त्याच्या कारकीर्दीचे मूल्यमापन करा. (गुण : १५)**

**उत्तर – प्रस्तावना –** चंद्रगुप्त कोण होता ते लिहावे.

**चंद्रगुप्त मौर्य –** साम्राज्यविस्तार, योग्यता – प्रचंड साम्राज्याचा निर्माता, महान क्रांतिकारक, समर्थ नेतृत्व, कल्याणकारी प्रशासक, महान त्यागी.

**समारोप –** मौर्यांचे साम्राज्य हे भारतातील पहिले मोठे साम्राज्य. त्याची पायाभरणी चंद्रगुप्ताने केली. तसेच परकीयांच्या आक्रमणाला समर्थपणे तोंड दिले.

**प्र. २. समुद्रगुप्ताच्या कर्तृत्वाचे वर्णन करा. (गुण : १५)**

**उत्तर – प्रस्तावना –** समुद्रगुप्त कोण होता ते लिहावे.

**समुद्रगुप्ताचे कर्तृत्व –** साम्राज्यविस्तार, मांडलिकत्वाच्या पद्धतीचा अवलंब विविध सत्तांशी मैत्री करार, अश्वमेध यज्ञ, नाणी, योग्यता..

**समारोप –** भारतातील सरंजामशाहीचा उद्‌गाता म्हणून समुद्रगुप्ताचे महत्त्व ४ ते ५ वाक्यांत लिहावे..

**प्र. ३. थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतीही २) (गुण : १५)**

**अ) ※मार्व साम्राज्याच्या विनाशाची कारणे लिहा.**

**उत्तर – प्रस्तावना –** ※मार्व साम्राज्य का व कसे संपले हे २ ते ३ वाक्यांत लिहावे..

**※मार्व साम्राज्याच्या विनाशाची कारणे –** दुबळे राज्यकर्ते, ※मार्व साम्राज्याचे विभाजन, खालावलेली आर्थिक स्थिती, सम्राट अशोकाचे धोरण, ब्राह्मणांचा प्रतिकार, एककेंद्री राज्यकारभार, ग्रीकांचे आक्रमण, जुलमी राज्यकारभार.

**समारोप –** ※मार्व साम्राज्याच्या ऱ्हासानंतर उदयाला आलेली राजघराणी याबाबत २ ते ३ ओळीत लिहावे.

**आ) गुप्त घराण्याचा ऱ्हास का झाला?**

**उत्तर – प्रस्तावना –** गुप्त घराण्याचा ऱ्हास कधी झाला ते लिहावे.

**गुप्त घराण्याचा ऱ्हास –** अकर्तबगार व दुबळे राजे, ※बाबद धर्माचा स्वीकार, वारसा संघर्ष, दुर्बल केंद्रसत्ता, वंशपरंपरागत अधिकारपदे, प्रांताधिकाऱ्यांची बंडखोरी, मांडलिक राजांची आक्रमकता, परकीयांची आक्रमणे, संपर्क व दळणवळणातील अडचणी, आर्थिक दौर्बल्य.

**समारोप –** ※मार्व साम्राज्याच्या ऱ्हासानंतर उदयाला आलेली राजघराणी याबाबत २ ते ३ ओळीत लिहावे.

**इ) कुशाणांविषयी माहिती लिहा.**

**उत्तर – प्रस्तावना –** कुशाणांनी भारतात कुठे साम्राज्य स्थापन केले?

**कुशाण –** मूळ स्थान, सम्राट कनिष्क, व्यापाराची भरभराट, *बाबद धर्माचा प्रसार.

**समारोप –** एकूणच परकीयांचा भारतीय संस्कृतीतील सहभाग महत्त्वाचा.

**ई) पाल, प्रतिहार आणि राष्ट्रकूट यांची माहिती देऊन त्यांच्यातील संघर्षाची माहिती द्या.**

**उत्तर – प्रस्तावना –** या सत्तांचा कालखंड.

**तिन्ही सत्तांची थोडक्यात माहिती –** (स्थान, महत्त्वाचे राजे, योगदान) संघर्षाची कारणे – राजकीय पोकळी व आर्थिक सामर्थ्य प्राप्त करणे, शेवटी विजय प्रतिहारांचा

**समारोप –** संघर्ष असूनही इतिहासामध्ये या सत्तांचे महत्त्वपूर्ण योगदान.

**प्र. ४. टिपा लिहा. (कोणत्याही २)** **(गुण : १५)**

**अ) संगम कालखंडातील वाङ्मय**

**उत्तर – प्रस्तावना –** संगम कालखंड म्हणजे काय ते २ ते ३ वाक्यांत लिहावे.

**संगम कालखंडातील वाङ्मय –** ३ सभा, मोठ्या संख्येने वाङ्मय निर्मिती, कवयित्रींचा सहभाग, स्वतंत्र द्रविडी अस्मितेचे जतन, विषय वैविध्य, पांड्य राज्यकर्त्यांचा आश्रय.

**समारोप –** सदर वाङ्मयाचे महत्त्व २ ते ३ वाक्यांत लिहावे.

**आ) प्राचीन भारतातील सामंतशाही**

**उत्तर – प्रस्तावना –** सामंतशाही म्हणजे काय ते २ ते ३ वाक्यांत लिहावे.

**भारतातील सामंतशाही –** मांडलिकत्वाची व्यवस्था, धार्मिक व सामाजिक क्षेत्रातील सामंतशाही.

**समारोप –** मध्ययुगातील सामंतशाही कशी होती याबद्दल २ ते ३ वाक्ये लिहावीत.

**इ) राष्ट्रकुटांचे योगदान**

**उत्तर – प्रस्तावना –** राष्ट्रकुटांच्या सत्तेचा परिचय.

**राष्ट्रकूट –** ज्ञान, विज्ञान, शिक्षण, साहित्य यांना उत्तेजन, वास्तुकला व शिल्पकला यांचा प्रसार – लेणी.

**समारोप –** आजही लेण्यांच्या रूपाने राष्ट्रकुटांच्या योगदानाची साक्ष.

**ई) विस्तीर्ण भारत**

**उत्तर – प्रस्तावना –** संकल्पनेचा अर्थ – भारतीय संस्कृतीचा प्रसार जगभरात झाल्याने भारताची व्याप्ती वाढली. ही व्याप्ती म्हणजेच विस्तीर्ण भारत – व्यापार व राजकीय विस्तार यांमुळे परदेशांशी संबंध, संबंधित देश राजसत्ता, धर्म, स्थापत्य, साहित्य, ज्ञान विज्ञान यांचे संक्रमण.

**समारोप –** भारताची ही सांस्कृतिक व्याप्ती भारताच्या राजकीय सामर्थ्याची व सांस्कृतिक संपन्नतेची साक्ष देते.

**प्र. ५. विद्यार्थी मित्रांनो, या प्रश्नामधील उपप्रश्नांची उत्तरे तुम्हाला पुस्तकात तयार मिळणार नाहीत. क्रेडिट सिस्टिममध्ये यु. जी. सी.च्या मार्गदर्शक तत्त्वानुसार विद्यार्थ्यांनी त्यांची निरीक्षणशक्ती, आकलनक्षमता व विचारशक्ती यांचा वापर करून काही काम करणे अपेक्षित आहे. खालील प्रश्न तुम्हाला**

**मनोरंजक व खऱ्या अर्थाने विचार व अभ्यास करायला प्रेरणा देणारे असतील.** **(गुण : २०)**

**अ) पर्यायी प्रश्न.** **(गुण : १६)**

खालील छायाचित्र (फोटो) महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध अजंठा लेण्यांचा आहे. खाली दिलेले या लेण्यांशी संबंधित

प्रश्न सोडवा. (उत्तरे लिहिण्यासाठी तुम्ही इंटरनेटचाही वापर करू शकता.)

१. लेणी हे इतिहासाची कोणत्या प्रकारची संदर्भ साधने आहेत?

२. अजंठा लेण्यांचा संबंध कोणत्या धर्माशी आहे?

३. ही लेणी काय हेतूने तयार करण्यात आली?

४. कोणत्या घराण्याच्या काळात ही लेणी कोरली गेली?

५. सोबत दिलेल्या महाराष्ट्राचा नकाशा काढा आणि त्यात अजंठाचे स्थान दाखवा.

६. ही लेणी कोणत्या जिल्ह्यामध्ये आहेत?

७. महाराष्ट्रातील इतर काही लेण्यांची नावे लिहा.

**आ) खालील राजांची यादी कालानुक्रमानुसार लिहा.** **(गुण : ४)**

प्रस्तुत प्रश्नामध्ये दिलेल्या राजांचा क्रम त्यांच्या कालखंडानुसार लावा. उदा. :

| **प्रश्नातील क्रम** | **कालानुक्रम** |
|---|---|
| १. शाहू | २. शिवाजी |
| २. शिवाजी | ३. संभाजी |
| ३. संभाजी | ४. राजाराम |
| ४. राजाराम | १. शाहू |

वर उदाहरणात दिल्याप्रमाणे खालील राजांचा योग्य क्रम लावा.

१. हर्षवर्धन

२. चंद्रगुप्त मौर्य

३. समुद्रगुप्त

४. अशोक

***

# मराठ्यांचा इतिहास (पेशवाई) (HC - 402)

**सत्र ३ : प्रकरण ८ ते १४**

---

**टीप : नमुना उत्तरात दिलेली प्रस्तावना व समारोप हे उदाहरणादाखल आहेत. त्या व्यतिरिक्त प्रश्नाशी सुसंगत अशी प्रस्तावना व समारोप स्वतंत्रपणे लिहिल्यास त्याचे स्वागतच आहे.**

**प्र. १. पानिपतच्या युद्धाची माहिती लिहा. (गुण : १५)**

**उत्तर – प्रस्तावना –** पानिपतचे युद्ध कोणात व कधी झाले आणि त्या युद्धाची पार्श्वभूमी याबाबत ४ ते ५ वाक्ये लिहावीत.

**पानिपतचे युद्ध–** कारणे, प्रत्यक्ष युद्ध, मराठ्यांचा पराभव, मराठ्यांच्या पराभवाची कारणे, पानिपतच्या युद्धाचे परिणाम.

**समारोप –** माधवराव पेशव्याने मराठी सत्तेची पुनर्स्थापना केली त्याबाबत ४ ते ५ वाक्यांत लिहावे.

**प्र. २. मराठेकालीन अर्थव्यवस्थेची सविस्तर माहिती द्या. (गुण : १५)**

**उत्तर – प्रस्तावना –** मराठेकाळातील कृषिप्रधान अर्थव्यवस्थेबद्दल २ ते ३ वाक्यांत लिहावे.

**मराठेकालीन अर्थव्यवस्था –** स्वयंपूर्ण खेडी, खेड्यांची रचना : मिरासदार व उपरे, बलुतेदार, अलुतेदार, उत्पन्नाच्या बाबी : जमीन महसूल, प्रत्यक्ष कर, अप्रत्यक्ष कर, इतर कर, खर्चाच्या बाबी.

**समारोप –** मराठेकालीन अर्थव्यवस्थेपेक्षा आजची अर्थव्यवस्था वेगळी कशी आहे ते २ ते ३ वाक्यांत लिहावे..

**प्र. ३. थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतीही २) (गुण : १५)**

**अ) स्वराज्य, चौथाई व सरदेशमुखी या सनदा मराठ्यांना कशा प्राप्त झाल्या?**

**उत्तर – प्रस्तावना –** स्वराज्य, चौथाई व सरदेशमुखी म्हणजे काय? २ ते ३ वाक्यांत लिहावे.

**स्वराज्य, चौथाई व सरदेशमुखी या सनदांची प्राप्ती –** दिल्लीतील अंतर्गत कलह, दिल्लीत सत्ताबदल करण्यासाठी सय्यद बंधूंकडून शाहूकडे मदतीची मागणी, तह होऊन या सनदा प्राप्त.

**समारोप –** सनदांचे मूल्यमापन २ ते ३ वाक्यांत करावे.

**आ) मराठे–पोर्तुगीज संबंधांची माहिती लिहा.**

**उत्तर – प्रस्तावना –** पोर्तुगिजांचे भारतातील आगमन व सत्तास्थापन याबाबत २ ते ३ वाक्यांत लिहावे..

**मराठे–पोर्तुगीज संबंध –** शिवकाळात पोर्तुगिजांच्या हालचाली, बाजीराव–पोर्तुगीज संघर्षाची कारणे, वसईची मोहीम, मराठ्यांचा विजय, मराठ्यांचा फायदा, पोर्तुगिजांचे बल. .

**समारोप –** वसई मोहिमेचे मूल्यमापन २ ते ३ वाक्यांत करावे.

**इ) मराठे काळातील स्त्रियांच्या स्थितीचे वर्णन करा.**

**उत्तर – प्रस्तावना –** प्राचीन काळापासून भारतीय समाज हा पुरुषप्रधान समाज होता. त्याची उदाहरणे द्या. (२ ते ३ वाक्ये)

**स्त्रियांची स्थिती –** बालविवाह, विषम विवाह, बहुपत्नीत्व, घटस्फोट व पुनर्विवाहास मान्यता नाही, विधवांची स्थिती, सती, कुणबिणी व गणिकांचे जीवन, मालमत्तेमध्ये अधिकार नाही, शिक्षणाचा अभाव, राजघराण्यातील स्त्रिया.

**समारोप –** मराठेकालीन स्त्रियांच्या तुलनेत आज स्त्रियांची परिस्थिती कशी आहे ते २ ते ३ वाक्यांत लिहा.

**ई) मराठा कालखंडातील न्यायव्यवस्थेचे व त्यात झालेल्या बदलांचे वर्णन करा.**

**उत्तर – प्रस्तावना –** राज्यकारभारातील न्यायव्यवस्थेचे स्थान व महत्त्व याबाबत २ ते३ वाक्ये लिहावीत.

**मराठा कालखंडातील न्यायव्यवस्था –** रचना – धर्मसभा, गोतसभा, सरकारी न्यायसभा – छत्रपती, पेशवा, इतर सरदार, ग्रामपंचायत, न्यायप्रक्रिया – साक्षीपुरावे, पण वकील द्यायची पद्धत नाही शिक्षा – प्रायश्चित्त, पैशाचा दंड, देहदंड.

**समारोप –** मराठेकालीन न्यायव्यवस्थेपेक्षा आजची न्यायव्यवस्था कशी वेगळी आहे हे २ ते ३ वाक्यांत लिहावे.

**प्र. ४. टिपा लिहा. (कोणत्याही २)** **(गुण : १५)**

**अ) मराठामंडळ**

**उत्तर – प्रस्तावना –** शिवकालीन अष्टप्रधान मंडळ यावर २ ते ३ वाक्ये लिहावीत.

**मराठामंडळ –** अष्टप्रधान मंडळाची कालबाह्यता, मराठा मंडळाची रचना का केली गेली, मराठमंडळाची व्यवस्था, मराठामंडळाचे दोष.

**समारोप –** भावी काळात मराठामंडळाने काय भूमिका बजावली त्याचे महत्त्व २ ते ३ वाक्यांत लिहावे.

**आ) भोपाळची लढाई**

**उत्तर – प्रस्तावना –** पालखेडची लढाई व मुंगीशेगावचा तह याबाबत २ ते ३ वाक्ये लिहावीत.

**भोपाळची लढाई –** पार्श्वभूमी : मराठ्यांची दिल्लीवर स्वारी, बादशहाचे निजामास निमंत्रण व मराठ्यांविरुद्ध मोहिमेची तयारी, बाजीरावाची स्वारी, भोपाळची लढाई, निजामाची कोंडी व पराभव, दोराहा सराईचा तह.

**समारोप –** भोपाळच्या लढाईचे महत्त्व २ ते ३ वाक्यात लिहावे.

**इ) मराठेकालीन धार्मिक जीवन**

**उत्तर – प्रस्तावना –** प्राचीन भारतातील धर्म यावर २ ते ३ वाक्ये लिहावीत.

**धार्मिक जीवन –** विविध पंथ व संप्रदाय, अनेकेश्वरवाद व मूर्तिपूजा, सण व उत्सव, सत्पुरुष, हिंदू व मुसलमान धर्मस्थळांना वर्षासने, दक्षिणा, संस्कार, रूढी–परंपरांचा प्रभाव, दैववाद, मुहूर्त पाहणे, जपजाप्य, व्रतवैकल्ये.

**समारोप –** आजचे धार्मिक जीवन कसे आहे याबद्दल २ ते ३ वाक्ये लिहावीत.

**ई) मराठेकालीन शिक्षणव्यवस्था**

**उत्तर – प्रस्तावना –** प्राचीन भारतीय शिक्षण पद्धती.

**मराठेकालीन शिक्षणव्यवस्था –** शिक्षण ही सरकारची जबाबदारी नव्हती, उतरंडीची रचना नाही, सहज शिक्षण– व्यवसाय व धार्मिक संस्कार, औपचारिक शिक्षण– लष्करी, व्यावहारिक व धार्मिक, पाठशाळा, प्राथमिक शिक्षण– लेखन, वाचन व हिशेब, नंतरचे शिक्षण प्रामुख्याने धार्मिक पुस्तके हस्तलिखितांच्या स्वरूपात. त्यामुळे पाठांतरावर भर. शिक्षण प्रामुख्याने ब्राह्मण व पुरुषांपुरते मर्यादित, ग्रंथप्रामाण्य व ✲पुढीप्रामाण्य यामुळे शिक्षण स्थितीशील.

**समारोप –** आजची शिक्षण पद्धती मराठेकालीन शिक्षण पद्धतीपेक्षा वेगळी कशी आहे ते २ ते ३ वाक्यांत लिहावे.

**प्र. ५. विद्यार्थी मित्रांनो, या प्रश्नामधील उपप्रश्नांची उत्तरे तुम्हाला पुस्तकात तयार मिळणार नाहीत. क्रेडिट सिस्टिममध्ये यु. जी. सी.च्या मार्गदर्शक तत्त्वानुसार विद्यार्थ्यांनी त्यांची निरीक्षणशक्ती, आकलनक्षमता व विचारशक्ती यांचा वापर करून काही काम करणे अपेक्षित आहे. खालील प्रश्न तुम्हाला मनोरंजक व खऱ्या अर्थाने विचार व अभ्यास करायला प्रेरणा देणारे असतील. (गुण : २०)**

**अ) खालील घटनांची मांडणी कालानुक्रमानुसार कर (गुण : ५)**

प्रस्तुत प्रश्नामध्ये दिलेल्या घटनांचा क्रम कालक्रमानुसार लावा.

उदा.

| प्रश्नातील क्रम | कालानुक्रम |
|---|---|
| १. शिवाजीमहाराजांचा राज्याभिषेक | २. शिवाजीमहाराजांचा जन्म |
| २. शिवाजीमहाराजांचा जन्म | १. शिवाजीमहाराजांचा राज्याभिषेक |
| ३. राजारामाचा मृत्यू | ४. संभाजीचा मृत्यू |
| ४. संभाजीचा मृत्यू | ३. राजारामाचा मृत्यू |

वर उदाहरणात दिल्याप्रमाणे खालील घटनांचा योग्य क्रम लावा.

१. बारभाई कारस्थान

२. पानिपतचे युद्ध

३. पहिले इंग्रज–मराठा युद्ध

४. सनदांची प्राप्ती

५. पेशवा माधवरावाची कारकीर्द

**आ) सोबत दिलेल्या नकाशाचा अभ्यास करा. १७६५ या काळातील राजकीय परिस्थिती दाखविणारा हा नकाशा आहे. सदर नकाशाशी संबंधित खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. (गुण : १५)**

१. या काळात कोणता पेशवा सत्तेवर होता?

२. मराठी राज्यात आजच्या कोणकोणत्या राज्यांचा समावेश दिसतो आहे?

३. मराठी राज्याच्या सीमेवर कोणकोणत्या सत्तांची राज्ये दिसत आहेत ते लिहा.

✻✻✻

# जपानचा इतिहास (HC - 403)

## सत्र ३ : प्रकरण ८ ते १३

**टीप : नमुना उत्तरात दिलेली प्रस्तावना व समारोप हे उदाहरणादाखल आहेत. त्या व्यतिरिक्त प्रश्नाशी सुसंगत अशी प्रस्तावना व समारोप स्वतंत्रपणे लिहिल्यास त्याचे स्वागतच आहे.**

**प्र. १. इ. स. १९१८ ते १९३२ या काळातील जपानच्या परराष्ट्र धोरणाची वॉशिंग्टन परिषदेच्या संदर्भात माहिती द्या. (गुण : १५)**

**उत्तर – प्रस्तावना –** १९१८ पूर्वीचे जपानचे आक्रमक परराष्ट्र धोरण, राजकीय पक्षांच्या हाती सत्ता, नव्या सरकारचे लष्कराचे महत्त्व कमी करण्याचे प्रयत्न.

**वॉशिंग्टन परिषद–** करार कधी, सहभागी राष्ट्रे, हेतू व हितसंबंध, चार सत्तांचा पॅसिफिक करार – सहभागी सत्ता व स्वरूप, पाच सत्तांचा नाविक करार – सहभागी सत्ता व स्वरूप, नऊ सत्तांचा मुक्तद्वार धोरण करार – सहभागी सत्ता व स्वरूप, इतर निर्णय व करार.

**वॉशिंग्टन परिषदेनंतर १९३२ पर्यंतचे परराष्ट्र धोरण**

**समारोप –** समझोत्याच्या धोरणाचे परिणाम व शेवट

**प्र. २. जपानच्या पुनर्घटनावर टीपण लिहा. (गुण : १५)**

**उत्तर – प्रस्तावना –** लष्करवादाच्या प्रभावातून जपानने इ. स. १९३१ पासून फार मोठा साम्राज्यविस्तार केला. दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरीस अमेरिकेने जपानच्या दोन शहरांवर अणुबाँब टाकले. परिणामी जपानला शरणागती पत्करावी लागली. यानंतर जपान अमेरिकेच्या ताब्यात गेला. सेनानी मॅक आर्थर याच्या नेतृत्वाखाली जपानचे पुनर्घटन करण्यात आले.

**जपानच्या पुनर्घटनामागील हेतू –** जपानमधील लष्करवादाचे व वृत्तीचे समूळ उच्चाटन करणे आणि रशियन नेतृत्वाखालील साम्यवादी प्रभावापासून जपानला दूर ठेवणे.

**पुनर्घटनासाठी राबविण्यात आलेल्या सुधारणा व धोरणे –** जपानचे निर्लष्करीकरण, युद्ध, गुन्हेगारांची चौकशी, लोकशाहीच्या विकासासाठी प्रयत्न, आर्थिक सुधारणा, औद्योगिक सुधारणा, शेती क्षेत्रातील सुधारणा, शैक्षणिक सुधारणा, सामाजिक सुधारणा.

**समारोप –** या सुधारणाच्या यशाच्या खात्रीनंतर जपानशी अमेरिकेचा शांतता करार, पुनर्घटनाच्या काळातील सुधारणामध्ये व जपानी समाजाच्या चिकाटी वृत्तीमध्ये जपानच्या आजच्या प्रगतीची बिजे.

**प्र. ३. थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतीही २) (गुण : १५)**

**अ) मध्ययुगीन जपानची अलिप्तता आधुनिक काळात का व कशी संपुष्टात आली?**

**उत्तर – प्रस्तावना –** १६ व्या शतकात ख्रिश्चन धर्माचे जपानमध्ये आगमन, परंतु संस्कृतीच्या अभिमानामुळे १७ व्या शतकात ख्रिश्चन धर्म व डच सोडता पाश्चात्त्य लोक सर्वांवरच बंदी आणि जपान जगापासून अलिप्त.

**अलिप्तता का व कशी संपुष्टात–** जपानशी व्यापाराची गरज, चीनबरोबरील व्यापारासाठी सागरी प्रवासात थांब्याची व इंधनाची गरज, खलाशांना मदतीची गरज या अनेकविध गरजांमुळे अमेरिकेतर्फे जपानला कमोडोर पेरी याची युद्धनौकांसह भेट, तोकुगावाकालीन शांतता, व्यापार व व्यापारी यांचे महत्त्व यामुळे जपान खुला व्हावा ही जपानमधील काही गटांची इच्छा या सर्व कारणांमुळे जपान परकीयांना खुला.

**समारोप –** जपान परकीयांना खुला झाल्याने जपानमध्ये परिवर्तनाची व आधुनिकतेची सुरुवात.

**आ) जेन्रो कालखंडातील आर्थिक विकासाचा आढावा घ्या?**

**उत्तर – प्रस्तावना –** जेन्रो कालखंड म्हणजे काय?

**जेन्रो कालखंडातील आर्थिक विकास –** चीन–जपान युद्ध, रशिया–जपान युद्ध व पहिले महायुद्ध यांचा आर्थिक फायदा, शेतीचा विकास, रेशीम उत्पादन, कापड, कागद, कृत्रिम खते, लोखंड, पोलाद इ. उद्योगांची वाढ, पायाभूत सुविधा, व्यापारवाढ, निर्यातवाढ.

**समारोप –** जेन्रोकालीन आर्थिक विकासातील झैबत्सुंचे योगदान.

**इ) जपानमधील पक्षीय शासनाच्या अपयशाची कारणे लिहा.**

**उत्तर – प्रस्तावना –** जपानमध्ये सुरुवातीपासून लष्कर व लष्करी पेशा यांना महत्त्व, पहिल्या महायुद्धानंतर राजकीय पक्षांच्या हाती सत्ता. १९१८ ते १९३२ या चौदा वर्षांच्या काळात ११ मंत्रिमंडळे सत्तेवर आली आणि गेली.

**पक्षीय शासनाच्या अपयशाची कारणे –** संपूर्ण संसदीय पद्धतीचा अभाव, राजकीय पक्षांचा दुबळेपणा, जपानी समाजव्यवस्था, प्रशासनाचे वर्चस्व, लष्कराचे प्रभुत्व, झैबत्सू, जपानची आर्थिक स्थिती.

**समारोप –** या टप्प्यानंतर पुन्हा एकदा जपानमध्ये लष्कराचे वर्चस्व.

**ई) त्रिपक्ष कराराची माहिती द्या.**

**उत्तर – प्रस्तावना –** जपानमधील लष्करवाद.

**त्रिपक्ष करार –** त्रिपक्ष करार कोणता व कधी? जर्मनीची भूमिका, जपानची भूमिका, करारातील अटी : जर्मनी व इटलीच्या युरोपातील प्रभावक्षेत्रास जपानची मान्यता, जपानच्या प्रभावक्षेत्रास जर्मनी व इटलीची मान्यता, आक्रमण झाल्यास परस्पर सहकार्य

**समारोप –** त्रिपक्ष कराराचा परिणाम.

**(सदर उत्तरात जपान–रशिया संबंधांचे विवेचन करू नये.)**

**प्र. ४. टिपा लिहा. (कोणत्याही २) (गुण : १५)**

**अ) मेईजी काळातील राजकीय सुधारणा**

**उत्तर – प्रस्तावना –** जपान परकीयांना खुला झाल्यावर इ. स. १८६८ मध्ये मुत्सुहितो याच्या हाती जपानची सत्तासूत्रे. या सम्राटाच्या कारकीर्दीमध्ये विविध क्षेत्रांमध्ये सुधारणांचा अंगीकार.

**मेईजी काळातील राजकीय सुधारणा –** शोगुन पद रद्द, सरंजामशाहीचा अंत, इ. स. १८८६ मध्ये जर्मनीच्या धर्तीवर नव्या राज्यघटनेची निर्मिती. या घटनेनुसार सम्राटाला महत्त्व व त्याचे पद दैवी मानले गेले. द्विगृही राष्ट्रीय विधीमंडळाची निर्मिती, वरिष्ठ सभागृह हे उमरावांचे, कनिष्ठ सभागृह लोकप्रतिनिधींचे, या गृहांचा

एकमेकांस शह, सम्राटाला नकाराधिकार, मंत्रिमंडळ लोकांना नव्हे तर सम्राटाला जबाबदार, मंत्रिमंडळाचे लष्करावर नियंत्रण नव्हते.

**समारोप –** मेईजी काळात नव्या राज्यघटनेनुसार लोकशाहीची निर्मिती पण खूप मर्यादा, सकृतदर्शनी सम्राटाची सत्ता सर्वोच्च पण प्रत्यक्षात सत्तासूत्रे जेन्रो या दाईम्यो व सामुराईंच्या महाजन सत्तेकडे.

**आ) रशिया–जपान युद्धाचे परिणाम**

**उत्तर – प्रस्तावना –** रशिया–जपान युद्ध का व कधी झाले याबाबत २ ते ३ वाक्ये लिहावीत.

**रशिया–जपान युद्धाचे परिणाम –** रशियावरील परिणाम, जपानवरील परिणाम, चीनवरील परिणाम, भारतावरील परिणाम.

**समारोप –** युद्धोत्तर मांचुरिया व कोरिया यावर २ ते ३ वाक्यांत लिहावीत.

**इ) मांचुरिया प्रकरण**

**उत्तर – प्रस्तावना –** १९०५ नंतर मांचुरियातील जपानचे वाढते वर्चस्व यावर २ ते ३ वाक्ये लिहावीत..

**मांचुरिया प्रकरण –** मुै॰ डेन प्रकरण, लिटन अहवाल, परराष्ट्रांच्या प्रतिक्रिया.

**समारोप –** मांचुकुओ राज्याची निर्मिती याबद्दल २ ते ३ वाक्ये लिहावीत.

**ई) दुसऱ्या महायुद्धातील जपानचा पराभव**

**उत्तर – प्रस्तावना –** दुसऱ्या महायुद्धातील जपानचा विस्तार यावर २ ते ३ वाक्ये लिहावीत.

**दुसऱ्या महायुद्धातील जपानचा पराभव –** जपानविरुद्ध मित्र राष्ट्रांची संयुक्त आघाडी, जपानचा माघारीचा प्रस्ताव, हिरोशिमा व नागासकीवरील अणुबॉम्बचा हल्ला, जपानची शरणागती

**समारोप –** जपानची युद्धोत्तर व्यवस्था (पुनर्घटन) यावर २ ते ३ वाक्ये लिहावित.

**प्र. ५. विद्यार्थी मित्रांनो, या प्रश्नामधील उपप्रश्नांची उत्तरे तुम्हाला पुस्तकात तयार मिळणार नाहीत. क्रेडिट सिस्टिममध्ये यु. जी. सी.च्या मार्गदर्शक तत्त्वानुसार विद्यार्थ्यांनी त्यांची निरीक्षणशक्ती, आकलनक्षमता व विचारशक्ती यांचा वापर करून काही काम करणे अपेक्षित आहे. खालील प्रश्न तुम्हाला मनोरंजक व खऱ्या अर्थाने विचार व अभ्यास करायला प्रेरणा देणारे असतील. (गुण : २०)**

**अ) खालील घटनांची मांडणी कालानुक्रमानुसार करा. (गुण : १०)**

प्रस्तुत प्रश्नामध्ये दिलेल्या राजांचा क्रम कालक्रमानुसार लावा.

उदा. :

| | |
|---|---|
| १. शिवाजीमहाराजांचा राज्याभिषेक | २. शिवाजीमहाराजांचा जन्म |
| २. शिवाजीमहाराजांचा जन्म | १. शिवाजीमहाराजांचा राज्याभिषेक |
| ३. राजारामाचा मृत्यू | ४. संभाजीचा मृत्यू |
| ४. संभाजीचा मृत्यू | ३. राजारामाचा मृत्यू |

वर उदाहरणात दिल्याप्रमाणे खालील घटनांचा योग्य क्रम लावा.

१. वॉशिंग्टन परिषद

२. रशिया–जपान युद्ध

३. पेरी मिशन

४. दुसरे महायुद्ध
५. पहिले चीन–जपान युद्ध

**आ) भारत ही जपानी वस्तूंची मोठी बाजारपेठ आहे. भारतात मिळणाऱ्या ५ जपानी वस्तूंची यादी तयार करा. (गुण : १०)**

***